# राष्ट्रीय शिक्षण

**डॉ. जयंत नारळीकर**
विश्वविख्यात वैज्ञानिक, नोबेल पारितोषिकाचे मानकरी
संचालक, इंटर युनिर्व्हसिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी ॲंड ॲस्ट्रॉफिजिक्स, पुणे

प्रचलित शिक्षण हे सर्वार्थाने राष्ट्रीय शिक्षण नव्हे. ब्रिटिश अमदानीत दिले जाणारे शिक्षण थोडा मुलामा चढवून आजही दिले जात आहे, फक्त ब्रिटिश आमदानीत गुणवत्तेचे जे निकष होते ते आज पुष्कळ पुसट झालेले दिसतात. सामान्यपणे ब्रिटिश राज्यकर्त्यांना सोयीचे प्रजाजन कसे तयार होतील हा लॉर्ड मेकॉलेपासूनचा उद्देश त्या काळच्या शिक्षणामागे होता. आजची परिस्थिती वेगळी आहे. स्वतंत्र भारताला गरिबीतून डोके वर काढून सन्मानाने जगात वावरता येईल असे शिक्षण मी राष्ट्रीय शिक्षण म्हणेन.

राष्ट्रीय शिक्षणाचे दोन महत्त्वाचे घटक म्हणजे विज्ञान आणि समाजशास्त्र. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या वाढत्या महत्त्वाची दखल न घेतल्यामुळे देशाला गुलामी पत्करावी लागली. हे विषय पाश्चात्य जगातले आहेत आणि आपणास त्यांची गरज नाही अशी एक विचारसरणी आजही आहे जिच्या आहारी जाता कामा नये. विज्ञान-तंत्रज्ञान हे राष्ट्रा-राष्ट्रांच्या सीमा पार करून पृथ्वीव्यापी झाले आहेत. त्यांची कदर घोकंपट्टी-पोपटपंचीने होत नसते. ते कुतूहलातून विकसित करावे लागतात, विज्ञान प्रत्येक आचरणातून व्यक्त झाले पाहिजे तर तंत्रज्ञान सामाजिक दृष्टिकोनातून तपासून वापरले पाहिजे. हे आपल्या शिक्षणातून व्यक्त होत नाही. समाजशास्त्रात आजच्या गरिबीचे कारण काय, अज्ञान आणि अंधश्रद्धांतून मार्ग कसा काढायचा, लोकसंख्यावाढीचे धोके काय इत्यादी प्रश्नांची चर्चा व्हायला पाहिजे तशी होत नाही. ह्यातच मोडणारे इतिहास-भूगोल हे विषय पाठांतरावर भर देऊन शक्य तितके रटाळपणे शिकवले जातात. त्यांत आज राष्ट्रीय गरजांवर उपयोगी माहिती पुष्कळ असूनही ती त्या स्वरूपात आकर्षक करून सांगितली जात नाही.

संस्कृत भाषेची अवहेलना ही अखेर भाषा विकासाच्या आणि साहित्यनिर्मितीच्या दृष्टीने महाग पडणार आहे.

विज्ञान हे शाळांत तरी मातृभाषेतून शिकवले जावे. विद्यार्थ्यांची विचार करायची प्रवृत्ती त्यामुळे वाढेल, आणि विज्ञानाच्या खुब्या समजतील. महाविद्यालयात इंग्रजी वापरावे.

प्राचीन शिक्षणपद्धतीतला पाठांतराचा दोष तेवढाच आपण घेतला आहे. उपनिषत्कालीन चौकसवृत्ती पुन्हा वाढवली पाहिजे. पूर्वीची गुरुकुल पद्धत परत आणता येईल, जिच्यात विद्यालये शासनापासून स्वतंत्र, अलिप्त आणि स्वायत्त असतील.

शिक्षकाला समाजात मान होता तो आता राहिला नाही. याचे मुख्य कारण म्हणजे शिक्षकी पेशातली अभ्यासक व समाजसुधारक प्रवृत्ती जाऊन गटबाजी, स्वार्थ आदी दुर्गुण तिथे शिरले. राष्ट्रीय शिक्षण तेव्हाच सार्थ होईल जेव्हा शिक्षक स्वतःचे राष्ट्रीय महत्त्व ओळखून तसे आचरण ठेवेल आणि समाज अशा शिक्षकांना मानाने वागवेल.

राष्ट्रीय शिक्षणाचे स्वरूप राष्ट्रीय गरजा भागवायला समर्थ पाहिजे. लोकशाहीत सर्वांना समान संधी मिळावी हे जरी मान्य केले तरी त्या संधीचा फायदा घेऊन सगळेच सारखी गुणवत्ता दाखवीत नाही. वास्तविक उच्च शिक्षणाचा खरोखर ज्यांना फायदा होईल असे थोडेच असतात. पण 'डिग्री नाही तर नोकरी नाही' ह्या तत्त्वामुळे सर्वच डिग्र्यांमागे धावतात. आणि ज्या थोड्यांनाच उत्तम उच्च शिक्षण मिळावे ते मिळत नाही. राष्ट्रीय गरजा भागविण्यासाठी सर्वांनीच दहावी-बारावी पुढे जायची गरज नाही. हे लक्षात घेऊन उच्च शिक्षणावरचा ताण कमी करावा आणि दहावी-बारावीपासूनच चांगल्या नोकऱ्या मिळतील अशी परिस्थिती आणावी.

☐ ☐

---

**म. गांधींच्या मते राष्ट्रीय शिक्षणाची वैशिष्टये**

१. शिक्षणाला भारतीय संस्कृतीचे अधिष्ठान असावे.

२. शिक्षण मातृभाषेच्याच माध्यमातून देण्यात यावे.

३. शिक्षण हे स्वाश्रयी असावे.

४ प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सक्तीचे व निःशुल्क असावे.

५. प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे हस्तव्यवसायाच्या माध्यमातून देण्यात यावे.

६. शिक्षण हे केवळ पुस्तकी किंवा बौद्धिक नसावे; त्यात ज्ञान व कृती यांचा समन्वय व्हावा.

७. उच्च शिक्षण हे राष्ट्राच्या गरजांशी निगडित असावे व त्याचा भार शक्यतो अशासकीय संस्थांनी उचलावा.

८. शिक्षणातून सर्वांगीण—शारीरिक, मानसिक व बौद्धिक विकास व्हावा.

' By education, I mean drawing out of the best in man-body mind and spirit '

महात्मा गांधी

---